आर.सी.एस क्र.५०/२०२१
प्रमिला वि. मुनेश्वर
नि.क्र.१६

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ ची उलटतपासणी**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -प्रमिला बबन कोलते

**उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे श्री एन.एस.इंगळे यांच्या मार्फत सुरू.**

**११.** माझ्या वडीलांचे गाव बेला आहे. मी व एक बहीण व एक भाऊ असे तिघे बहीण-भाऊ आहोत. आमच्या भावंडांमध्ये प्रतिवादी क्र.३ शोभा ही सर्वात मोठी आहे. त्यानंतर मी मोठी आहे व माझ्यानंतर माझा भाऊ प्रतिवादी क्र.१ असे आहोत. माझा जन्म बेला येथे झालेला आहे. माझी जन्मतारिख १९७० च्या दरम्यानची आहे. माझे शिक्षण इय्यता ८वी पर्यंत बेला येथे झालेले आहे. माझ्या शिक्षणाचा खर्च माझ्या वडीलांनीच केलेला आहे. माझ्या वडीलांच्या नावाने असलेल्या घरामध्ये माझा जन्म झाला होता. माझे लग्न सन १९८६ मध्ये नागपूर येथे झाले. माझ्या लग्नाचा खर्च माझ्या वडीलांनीच केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर माझ्या वडीलांनी मला घरखर्चासाठी दोन लाख रूपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी वडीलोपार्जित शेतीमध्ये हिस्सा मागणार नाही असे कबूल केले होते. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांच्या नावाने असलेल्या घराचा नंबर ग्रामपंचायत घर क्र.१०९७ असा आहे. सदर घर मी सदर दाव्यामध्ये समाविष्ठ केलेले नाही व त्यामध्ये हिस्याची मागणीसुध्दा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी शेत गट न.२२ च्या अनुषंगाणे दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अंशता वाटणी हिस्सा होउन मिळण्याचा दावा दाखल केला आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ मुनेश्वर हा कुही येथे राहतो व तो नोकरीवर आहे. माझी आई जिवंत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ मुनेश्वर याने माझ्या वडीलांची म्हातारपणी सेवा केली. साक्षीदार स्वत:हून सांगते की, त्याने माझ्या वडीलांना बाहेर फेकून दिले.

**प्रतिवादी यांच्या वकीलांनी लेखी अर्ज दाखल करून दस्तऐवज दाखल करण्याकामी प्रकरण तहकूब करण्याची विनंती केली सबब उलटतपास तहकूब.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि २६/०८/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड